आर.सी.सी. १६१/२०२४
सरकार वि. दादाभाऊ मुठे
**निशाणी १५**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. २ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

| | |
|---|---|
| माझे नाव — पांडुरंग चिंधू भांगरे, | वय — ३६ वर्षे, |
| व्यवसाय — शेती, | राहणार — खडकी खु., |
| तालुका – अकोले, | जिल्हा – अहमदनगर. |

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. फिर्यादी ही माझी बहीण आहे. तिचे लग्न दादाभाऊ सोबत दिनांक ३०.०४.१९९९ रोजी झाले होते. लग्नानंतर ती व्यवस्थित नांदत होती व तिला दोन मुले झाली. त्यानंतर दादाभाऊ मुठे यांना दारूचे व्यसन लागले. आरोपींनी माझ्या बहिणीकडे घराचे कर्ज झाल्यामुळे वीस हजार रुपयांची मागणी केली. त्यानंतर तिचा छळ करण्यास सुरूवात केली, तिला उपाशी ठेवत होते. हा सर्व प्रकार तिने माहेरी आल्यावर सांगितला. आम्ही त्यांना जावून समज दिली. परंतु, त्यांच्यामध्ये काही फरक पडला नाही. दादाभाऊ यांचे गावातील योगिता कचरे हिचे सोबत अफेयर झाले. माझ्या बहिणीने दादाभाऊ यांना त्या महिलेबाबत जाब विचारला असता त्यांनी माझ्या बहिणीला ठार मारण्याची धमकी दिली व येथे राहायचे नाही असे म्हणाले. त्यानंतर दादाभाऊ हे योगिता सोबत पळून गेले. ते आलेच नाहीत. आम्ही त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. आरोपी त्रास देत होते म्हणून माझी बहीण माहेरी आली व तिने आरोपीविरूध्द फिर्याद दिली. पोलीसांनी माझ्याकडे घटनेबाबत चौकशी केली नव्हती. मी आरोपीस ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. बी. व्ही. मोरे यांच्या मार्फत</u> –**

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्यासमक्ष कधीही माझ्या

बहिणीकडे वीस हजार रूपयांची मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्यासमक्ष माझ्या बहिणीचा कधीही छळ केला नाही. आरोपींनी माझ्या बहिणीचा कोण्त्या तारखेला छळ केला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही खडकीवरून दादाभाऊ यांच्या घरी वीस ते पंचवीस लोक गेलो होतो. आम्ही घरातील ४–५ लोक गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आमच्यामध्ये व दादाभाऊ मध्ये वाद झाले व आम्ही दादाभाऊ यांना मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या या त्रासाला कंटाळून दादाभाऊ हा फरार झाला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी दादाभाऊ व योगिता यांचे अफेयर मी माझ्या डोळयाने पाहीलेले नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, दादाभाऊ याने माझ्या बहिणीस ठार मारण्याची धमकी कोणत्या तारखेला, कोणत्या महिन्यात व कोणत्या वर्षी दिली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दादाभाऊ हा योगितासोबत कधी पळून गेला याची तारीख, महिना, वर्ष मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दादाभाऊ यांचे अफेयर होते, ते योगिता सोबत पळून गेले, जाब विचारला असता जिवे मारण्याची धमकी दिली ही माझी ऐकीव माहीती आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी ही माझी बहीण असल्यामुळे तिच्या प्रेमापोटी तिच्या सांगण्यावरून खोटा जबाब देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.04.07 17:06:51 +0530

दिनांक ०७.०४.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.